अतितात्काळ/महत्वाचे

महाराष्ट्र शासन

# पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर

दुरध्वनी क्र.०७२१-२५५१००१, फॅक्स क्र.२५५१०१०
ई-मेल आयडी cp.amravati@mahapolice.gov.in

31 JUL 2023

क्रमांक :- पोआअ/आस्था-१/अर्हता परीक्षा-१३/जेष्ठता यादी/ 4862 /२०२३, अमरावती दिनांक :- ३१.०७.२०२३

संदर्भ :- मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३/५३/२०१८, दि.२५.०७.२०२३

विषय :- विभागीय अर्हता परीक्षा सन २०१३ मधील उत्तीर्ण अंमलदारांची सेवाज्येष्ठता यादी त्यांचे सदर परीक्षेतील गुणांसह प्रकाशित करणेबाबत.

*****

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरून कळविण्यात येते की, विभागीय अर्हता परीक्षा २०१३ उत्तीर्ण असलेले १९३६३ अंमलदारांची सेवाज्येष्ठता यादी, त्यांना मिळालेल्या गुणांसह त्यांचे भरती दिनांकनिहाय अंतरिम (Provisional) सेवाज्येष्ठता यादी https://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली व https://amravaticpoffice.org/flash.php या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

तरी सदरची प्रत संबधित पोलीस ठाणे/शाखा प्रमुख यांनी संकेतस्थळावरून डाऊनलोड करून ती आपले अधिनस्त सर्व पोलीस अंमलदार यांचे निदर्शनास आणून द्यावी. **सदर सेवाज्येष्ठता यादीतील अर्हता परीक्षा उत्तीर्ण पोलीस अंमलदारांनी आपले (१) नांव (२) जात (३) मुळ जिल्हा (४) भरतीचा दिनांक (५) सेवानिवृत्तीचा दिनांक (६) सध्याची नेमणूक इत्यादी बाबी तपासून माहिती अचुक असल्याची खात्री करावी. तसेच यादीबाबत पोलीस अंमलदार यांचे काही आक्षेप असल्यास, त्याबाबत त्यांना अभिवेदन दिनांक ०३.०८.२०२३ पर्यंत आस्थापना शाखा येथे थेट सादर करणेबाबत सुचीत करावे.** दिनांक ०३.०८.२०२३ पर्यंत पोलीस अंमलदार यांचे आक्षेप प्राप्त न झाल्यास माहिती अचुक असल्याचे गृहीत धरून त्याबाबतचा अहवाल मा.पोलीस महासंचालक यांचे कार्यालयास सादर करण्यात येईल व त्यानंतर त्यांचे अभिवेदनावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येणार नाही याबाबत पोलीस अंमलदार यांना अवगत करावे.

31/7

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्यालय),
अमरावती शहर

प्रति,

सर्व पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे/शाखा, अमरावती शहर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर
पोलीस उपनिरीक्षक, आरसीपी/क्युआरटी/श्वान पथक, अमरावती शहर

प्रत,

पोलीस निरीक्षक, पो.स्टे.सायबर, अमरावती शहर

**२/- मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २५.०७.२०२३ चे परिपत्रक यासोबत जोडून पाठविण्यात येत असून, सदरचे परिपत्रक पोलीस आयुक्त, अमरावती शहरचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.**